महाराष्ट्र शासन

**सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव व विशेष चौकशी अधिकारी-२**

सामान्य प्रशासन विभाग,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

क्रमांक:अशैसं-२००७/१६१ /प्र.क्र१४५/२००७/३५ दिनांक :- १६ नोव्हेंबर, २००७.

# ना-हरकत प्रमाणपत्र

सेंट जोसेफ एज्युकेशन सोसायटी, नाशिक या शैक्षणिक संस्थेने त्यांच्या संस्थेस धार्मिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून ना हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी दि. २५.०७.२००७ रोजी अर्ज सादर केला होता. या अर्जातील माहिती व अर्जासोबतच्या संबंधित कागदपत्रांची प्राथमिक छाननी, याकरिता नियुक्त केलेल्या छाननी समितीने केली. छाननी समितीच्या निष्कर्षानुसार तसेच दि.१५ नोव्हेंबर, २००७ रोजी माझ्या समक्ष संबंधित संस्थेसोबत झालेल्या सुनावणी दरम्यान संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या सादरीकरणाच्या आधारे सदर संस्था ही सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.असंस-२००६/६३४/प्र.क्र.६३/२००६/३५, दि.११ जून, २००७ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकषांतर्गत राज्य शासनाने घोषित केलेल्या धार्मिक (ख्रिश्चन) अल्पसंख्याकामधील व्यक्तींकडून अथवा व्यक्तींच्या समुदायाकडून स्थापित व संचालित करण्यात येत असल्याबाबत माझे समाधान झाले आहे. परिणामत: सदर संस्था ही राष्ट्रीय अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था आयोग अधिनियम, २००४ च्या कलम २ (छ) च्या अर्थानुसार व भारतीय संविधानाच्या कलम ३० अंतर्गत अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था असल्याचे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

हे ना-हरकत प्रमाणपत्र केवळ महाराष्ट्र राज्यापुरते लागू असेल. सदर संस्थेस प्रदान करण्यात आलेला धार्मिक अल्पसंख्याक दर्जा हा संस्था संचालित करत असलेल्या सर्व शैक्षणिक शाखांना लागू राहील.

उपरोल्लेखित शैक्षणिक संस्थेस याद्वारे प्रदान करण्यात आलेला धार्मिक अल्पसंख्याक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून पुढील तीन वर्षांकरिता विधिग्राह्य असेल. संबंधित संस्थेने सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.असंस- २००६/६३४/प्र.क्र.६३/२००६/३५, दि.११ जून, २००७ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकष व अटींची सातत्याने व विनिर्देशपूर्वक पूर्तता करणे बंधनकारक राहील. या निकष व अटींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास संस्थेचा अल्पसंख्याक दर्जा रद्द करण्यात येईल.

(सही)

( टी. एफ. थेक्केकरा )

सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव व विशेष चौकशी अधिकारी-२

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

सामान्य प्रशासन विभाग

महाराष्ट्र